# जिल्हा परिषद उस्मानाबाद

# कृषी विभाग

## नवीन राष्ट्रीय बायोगॅस व सेंद्रिय खत व्यवस्थापन कार्यक्रम

## २०१९-२०२०

# यशोगाथा

पंचायत समिती तुळजापूर

कृषी विभाग

- योजनेचे नाव :- नवीन राष्ट्रीय बायोगॅस व सेंद्रिय  खत व्यवस्थापन कार्यक्रम
- योजनेचे वर्ष :- २०१९-२०२०
- लाभार्थीचे नाव :- सौ.राणी अमोल पाटील
- गाव :- सांगवी(काटी) ता.तुळजापुर
- सयंत्राचा आकार :- ३ घ.मी.
- सयंत्राचा प्रकार :- दिनबंधू
- जनावरांची संख्या :- १०
- कुटुंब सदस्य संख्या :- ०६
- जमिनीचे क्षेत्र :-  २ हे.




मा.जिल्हा कृषी वि.अ. बायोगॅस सयंत्र पाहणी करताना

***बायोगॅस घेण्यापुर्वीची पार्श्वभूमी*** :-

मी अल्पभूधारक शेतकरी असून माझ्याकडे म्हशी,गायी व बैल मिळून एकूण १० जनावरे आहेत.माझ्या कुटुंबात ६ व्यक्ती आहेत बायोगॅस सयंत्र घेण्यापूर्वी माझ्या जानावरापासून मिळणाऱ्या शेणाचा व गोमुत्राचा उपयोग शेतात खत व स्वयंपाकाला इंधन म्हणून करत होते.तसेच शेतातील झाडाझुडपांचा जळनाकरिता वापर करीत होते.मी शेतात वापरत असलेले शेण हे पूर्णपणे कुजत नसल्यामुळे खत व्यवस्थित होत नव्हते व गोवऱ्याकरिता शेणाचा वापर केल्यामुळे शेण वाया जात होते.त्यावेळी माझी भेट पंचायत समितीच्या कृषी विभागातील अधिकाऱ्यांशी झाली.त्यांनी मला बायोगॅस सयंत्राबाबत सविस्तर माहिती दिली व त्याचे महत्व पटवून दिले. त्यामुळे मी बायोगॅस सयंत्र घेण्याचे ठरवले.

***बायोगॅस कार्यान्वीत केल्यानंतरची स्थिती :-***

माझे बायोगॅस सयंत्र अतियश चांगले चालत असून मला माझ्या कुटुंबाची स्वयंपाकासाठी लागणाऱ्या गॅसची संपूर्ण गरज या बायोगॅसमुळे भागली आहे.स्वयंपाक करताना धुरापासून होणारा त्रास बंद झाला आहे.तसेच वेळेची व खर्चाची बचत झाली आहे.

माझी द्राक्षबाग असून मी बायोगॅसमधून निघणाऱ्या स्लरी खत म्हणून द्राक्ष बागेला वापरत आहे. त्यामुळे माझे शेतीचे उत्पन्न वाढले आहे.

बायोगॅस सयंत्र घेतल्यामुळे माझे व माझ्या कुटुंबाचे जीवनमान उंचावण्यास फार मोठी मदत झाली आहे.

**धन्यवाद !**

*सौ.राणी अमोल पाटील*

*रा.सांगवी(काटी) ता.तुळजापुर*




मा. जिल्हा कृषी.वि.अ. बायोगॅस सयंत्र पाहणी करताना